# जिल्हा माहिती कार्यालय, अहमदनगर

दूरध्वनी : ०२४१ – २४११२१२ Email : dionagar12@gmail.com Fax: ०२४१ – २४२७३७३

वृत्तपत्राचे नांव – नगर सह्याद्री दिनांक: 26/1/२०14


## लोकशाहीचा पाया सदृढ करण्यासाठी

# सर्वांनी मतदानाचा पवित्र हक्क बजवावा- डॉ. संजीवकुमार

अहमदनगर । प्रतिनिधी

लोकशाहीचा पाया अधिक सदृढ करण्यासाठी सर्वांनी मतदानाचा पवित्र हक्क बजावला पाहिजे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. संजीव कुमार यांनी केले. अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात नवमतदारांना छायाचित्र मतदार ओळखपत्र , बिल्ले, विविध स्पर्धेतील विजेत्यांना प्रशस्तीपत्रक वितरण जिल्हाधिकारी डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रुबल अग्रवाल,मनपा आयुक्त विजय कुलकर्णी, पोलिस उपअधिक्षक शाम घुगे, सीएसआरडीचे के के कनोजिया, उप जिल्हा निवडणूक अधिकारी सुनिल माळी , उपजिल्हाधिकारी (महसूल) दत्तात्रय बोरुडे, जिल्हा पुनर्वसन अधिकारी गोरक्ष गाडीलकर , उपजिल्हाधिकारी (रोहयो) राहुल पाटील, उपविभागीय अधिकारी राजेद्र पाटील, आदि



उपस्थित होते. भारत देश स्वातंत्र्य झाल्यानंतर सर्वाना समान मतदानाचा अधिकार दिला गेला. इतर देशात हा अधिकार टप्याटप्याने दिला गेला. देशाचे भविष्य अधिक उज्वल घडविण्यासाठी इतरांबरोबर मतदारांचा मोलाचा वाटा आहे. मतदानाची टक्केवारी वाढत आहे. हे सदृढ लोकशाहीचे द्योतक आहे. म्हणून मतदारांनी दूरदृष्टी ठेवून मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीचा पाया अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करावा असे सांगून डॉ. संजीव कुमार यांनी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. लोकशाहीचा पाया अधिक समृध्द व सशक्त करण्यासाठी लोकशाहीवर निष्ठा ठेवून निर्भयपणे व विचारपूर्वक सर्वांनी मतदान करावे असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रुबल अग्रवाल यांनी केले.

यावेळी मतदारामध्ये जनजागृतीसाठी घेण्यात आलेल्या निबंध , घोषवाक्य व भितीपत्रक स्पर्धेतील विजेत्यांना डॉ.संजीव कुमार यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देवून गौरविण्यात आले. जिल्हाधिकारी यांनी नवमतदारांना प्रतिज्ञा ही यावेळी दिली.प्रारंभी उप जिल्हा निवडणूक अधिकारी सुनिल माळी यांनी मान्यवरांचे पुष्प गुच्छ देवून स्वागत केले. उप विभागीय अधिकारी राजेंद्र पाटील यांनी आभार मानले तर अमोल बागुल यांनी सुत्रसंचलन केले.

या समारंभास क्रीडाधाकारी भाऊराव वीर, निवडणूक शाखेचे तहसीलदार चंद्रकांत डमाळे, नायब तहसीलदार सर्वश्री प्रशांत गोसावी, दत्तात्रय लोखंडे, श्रीमती माधुरी आंधळे, आदि अधिकारी व कर्मचारी नवमतदार, नागरिक, विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.


जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर (निवडणूक शाखा) 14 FEB 2014 तहसीलदार

जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर
क्रमांक शाखा / कार्याशि/संकीर्ण/ 259/2014
अहमदनगर, दिनांक 11/2/2014
निवडणूक शाखा – अहमदनगर
उ/- माहितीसाठी पुढील योग्य त्या उचित कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित